महाराष्ट्र शासन

आदिवासी विकास विभाग

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गडचिरोली जि.गडचिरोली

# शासकीय आदिवासी आश्रमशाळांना अंडी पुरवठा करणेबाबत

**आश्रमशाळेचे नाव- ---------------------------------------------**

(ज्या आश्रमशाळेकरिता निविदा अर्ज भरण्यात येत आहे त्याआश्रमशाळेचे नाव वर नमुद करणे अनिवार्य आहे)

## (ई-निविदा तृतीय वेळ)

सन २०२०-२१

Egg tender 20-21



## निविदेची माहिती

| | |
|---|---|
| निविदा सुचना क्रमांक | प्रअगड/क्र./भांडार/का-३/अंडी पुरवठा निविदा/१५४५/२० |
| निविदा सुचना दिनांक | १० / ०८/२०२० |
| विभाग | आदिवासी विकास विभाग नागपूर |
| कार्यालयाचा पत्ता | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गडचिरोली जि.गडचिरोली |
| कार्यालय प्रमुख | राहुल गुप्ता , ( भा.प्र.से) |
| पदनाम | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गडचिरोली |
| निविदेची किंमत रुपये | ४.९० लक्ष (अक्षरी रुपये चार लक्ष नव्वद हजार रुपये फक्त ) |

## निविदा सूचना

**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गडचिरोली** यांच्या अधिनस्त असलेल्या शासकीय आश्रमशाळा **मसेली, भाकरोंडी, कुरंडीमाल, कोरची, कोटगुल, सावरगाव, रांगी, ग्यॅरापत्ती, गोडलवाही,** येथील विद्यार्थ्यांना सन २०२०-२१ या वर्षाकरीता अंडीचा पुरवठा करणेबाबत आश्रमशाळा निहाय ई निविदा मागवीत आहेत. ही निविदा महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या साईटवर प्रसिध्द करण्यात येत आहेनिविदापत्र दोन लिफाफा पध्दतीनुसार (टू - बिड) स्विकारण्यात येतील.

| अ.क्र. | वस्तूचे नांव | विहीत स्पेशिफिकेशन | अंदाजित रक्कम रुपये | निविदा अर्जाची किंमत | बयाणा रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | अंडीचा पुरवठा करणे | परिशिष्ट १ प्रमाणे | ४.९० लक्ष | १,२००/-(ना परतावा) | ६०००/- |

ऑनलाईन निविदा विक्री
ऑनलाईन निविदा स्विकृती
ऑनलाईन तांत्रीक निविदा उघडणे
ऑनलाईन व्यापारी निविदा उघडणे

} सोबतच्या निविदा वेळापत्रकानुसार .

**<u>सूचना :</u>**

१. निविदा ऑनलाईनच भरण्यात यावी.
२. अपूर्ण व सशर्त तसेच अटींची पूर्तता न केलेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.
३. ऑनलाईन अपलोड केलेली निविदेची कागदपत्रे स्वसाक्षांकीत असणे आवश्यक. तसेच सादर केलेली कागदपत्रे सत्य असल्याबाबत व त्यामध्ये कोणताही खोटेपणा आढल्यास पुरवठादार स्वःत जवाबदार राहील. या आशयाचे शपथपत्र सादर करावे.
४. निविदेच्या वेळेपत्रकानुसार निविदा उघडणे काही कारणास्तव शक्य न झाल्यास खरेदी समिती निश्चित करेल त्या दिनांकास निविदा उघडण्यात येतील. या निविदाबाबत यापुढे दिलेल्या अटी व शर्ती व्यतिरिक्त कांही अतिरिक्त अटी व शर्ती यांचा समावेश करण्याचा अधिकार खरेदी समितीने राखून ठेवलेला आहे व अशा अतिरिक्त अटींचा पुरवठा आदेशात व करारनाम्यात समावेश करण्यात येईल. तसेच निविदेतील खरेदीची रक्कम व वस्तु या अंदाजित असून त्यामध्ये प्रत्यक्ष वस्तूंच्या मागणी व परिमाणानुसार बदल होऊ शकेल.
५. उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दिनांक १ डिसेंबर, २०१६ मधील तरतूदी व आदिवासी विकास विभाग यांचे वेळोवेळी निर्गमित अनुषंगीक शासन निर्णय व विहित नियम लागू राहतील.
६. तांत्रीक लिफाफा मधील कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर पात्र निविदाधारकाने पुरवठा करावयाच्या वस्तुचा नमुना प्रकल्प कार्यालयास सादर करणे अनिवार्य आहे दिलेल्या स्पेशीफिकेशन प्रमाणे वस्तुंचा नमुना नसल्यास त्याविषयी समितीचा निर्णय अंतीम राहिल.

## <u>ई निविदेचे वेळापत्रक</u>

| अ.क्र. | घटनाक्रम तपशील | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| 1. | संकेतस्थळावर निविदा प्रकाशीत करणे | 13 08 .2020 | दुपारी 12.00 वाजेपर्यंत |
| 2. | संकेतस्थळावरून निविदा प्राप्त करणे (Download) | 13 .08 .2020 ते 20 .08.2020 | दुपारी 17.00 वाजेपर्यंत |
| 3. | प्री-बीड मिटींग | 14 /08/2020 | कालावधीत Pogadchiroli @yahoo.co.in या मेलवर सुचना सादर करणे. |
| 4. | संकेतस्थळावर निविदा सादर करणे (Upload) | 14 .8 .2020 ते 20 .8.2020 | दुपारी 15.00 वाजेपर्यंत |
| 5. | संकेतस्थळावरून प्राप्त निविदा उघडणे | 24 .08.2020 | दुपारी 4.00 वाजता किंवा समितीचे सोईनुसार |
| 6 | निविदाधाकांचे तांत्रिक लिफाफयाबाबत तक्रार सादर करणे | 26 .08.2020 | सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत |

## महत्वाच्या सूचना :

१. सर्व इच्छुक निविदाकारांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रीयेत भाग घेण्यासाठी ई निविदा प्रणालीचा http://www.mahatenders.gov.in या Portal वर enroll करणे आवश्यक आहे.

२. निविदाकारांना वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन enrollment करणे संदर्भात व डिजिटल प्रमाणपत्र वितरीत करण्या संदर्भात काही शंका / अडचणी असल्यास संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या हेल्पलाईन नंबरवर / दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

३. निविदा फॉर्म शुल्क व बयाणा रक्कम ऑनलाईन स्वरुपात (online Payment Gateway mode) भरणे आवश्यक आहे. बयाणा रक्कम (EMD) भरणेस सुट असल्यास त्याबाबतचे सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र (As per Industry Dept. G.R. 1/12/2016 Para no. 3.1.2.1. - Annexure-8) ऑनलाईन पध्दतीने सादर करणे (to be uploaded) बंधनकारक आहे. E-Payment Gateway संदर्भात आवश्यक माहिती ई-निविदा वेबसाईट http://www.mahatenders.gov.in वर उपलब्ध आहे.

४. सर्व इच्छुक निविदाकारांना सूचित करण्यात येते की, सदर निविदेची कार्यवाही ऑनलाईन पध्दतीने पार पाडण्यात येईल. काही तांत्रीक अडचणी उद्‌भवल्यास वेबसाईट http://www.mahatenders.gov.in या वेबसाईटवरील मदत केंद्रावर संपर्क करावा. इंटरनेट, विद्युतपुरवठा किंवा संगणक बिघाड इत्यादी कारणांमुळे निविदा सादर करण्यास विलंब झाल्यास त्याची जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही. तसेच वरील वेळापत्रकानुसार त्या त्या स्तरावर कार्यवाही यशस्वीरित्या पुर्ण करावयाची जबाबदारी ही निविदाकारांची राहील. ईमेल, फॅक्स, हस्तेपोच इत्यादी द्वारे सादर केलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.

५. सदर निविदा मंजूर करणे, त्यामधील अटी व शर्तीमध्ये वाढ करणे किंवा शिथील करणे, निविदा उघडण्याचा दिनांक पुढे ढकलणे तसेच निविदा प्रक्रीयेत बदल करणे अथवा संपुर्ण निविदा प्रक्रीया रद्द करणे व इतर बाबतचे संपुर्ण हक्क व निर्णय प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गडचिरोली यांनी राखून ठेवले आहेत.

६. संयुक्त भागीदारी (Joint Venture) स्वरुपातील संस्था सदर निविदेस पात्र ठरणार नाहीत.

७. निविदेतील नमुद वेळापत्रकानुसार Pre-Bid Meeting मध्ये नमुद केल्याप्रमाणे आपले सुचना मेलवर सादर करावे.

८. एकापेक्षा जास्त पुरवठादाराची नेमणूक करण्याचे अधिकार प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गडचिरोली यांनी राखून ठेवले आहेत.

९. तांत्रीक लिफाफा मधील कागदपत्रांची तपासणी केल्या नंतर पात्र निविदाधारकाने पुरवठा करावयाच्या वस्तुचा नमुना प्रकल्प कार्यालयास सादर करणे अनिवार्य आहे दिलेल्या स्पेशीफिकेशन प्रमाणे वस्तुंचा नमुना नसल्यास त्याविषयी समितीचा निर्णय अंतीम राहिल.

**१०. प्रत्येक आश्रमशाळेकरिता स्वतंत्र निविदा अर्ज भरण्यात यावा व स्वाक्षरीसह ऑनलाईन तांत्रिक लिफाफयात अपलोड करावा.**

**११. दर मंजुर करण्यात आलेल्या निविदाधारकास आदेश प्राप्त करतेवेळी निविदेच्या मुल्याच्या ३% रक्कम प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गडचिरोली यांचे नावे सुरक्षा ठेव म्हणून कार्यालयास (अनामत रकमेतून सुट असल्यासही) बँक गॅरंटीव्दारे (नमुना सलग्न) कार्यालयास जमा करणे बंधनकारक आहे.**

१२. ई-निविदा पध्दत ही व्दी-लिफाफे पध्दतीची असल्याने अनामत रकमेचे Online Payment केल्यानंतर लिफाफा क्रमांक अ (तांत्रिक लिफाफा) या मध्ये मागणी केलेली आवश्यक असलेली कागदपत्रे स्कॅनं करुन अपलोड करण्यात यावी. लिफाफा क्रमांक ब (व्यापारी लिफाफा) यामध्ये फक्त ऑनलाईन दरपत्रक भरण्यात यावी.

१३. ई-निविदा अर्जाची किंमत रक्कम (ना परतावा) व EMD ची रक्कम प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गडचिरोली यांचे नावे Online Payment व्दारे भरणा करावी. व भरणा केल्याची पावती स्कॅन करुन अपलोड करावी.

१४. प्राप्त ई-निविदा उपस्थित निविदाधारंकासमक्ष किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधी समक्ष शक्यतो संकेतस्थळावर दिलेल्या वेळापत्रकानुसार लिफाफा क्रमांक ब (व्यापारी लिफाफा ) उघडण्याची कार्यवाही करण्यात येईल. काही अपरिहार्य कारणामुळे वरील दिनांकास निविदा उघडणे शक्य न झाल्यास तशी माहिती सुचना फलकावर लावण्यात येईल.

१५. निविदा उघडतांना प्रथम लिफाफा क्रमांक अ (तांत्रिक लिफाफा) उघडण्यात येईल, त्यामध्ये आवश्यक त्या कागदपत्रांची व अटी / शर्तीची पुर्तता केली असल्याची खातरजमा करण्यात येईल. तांत्रिक दृष्टया सर्व अटी व शर्तीची पुर्तता करणाऱ्या पुरवठा धारकांचा लिफाफा ब (व्यापारी लिफाफा ) ठरलेल्या दिवशी किंवा समितीचे सोईनुसार उघडण्यात येईल. लिफाफा क्रमांक अ मधील आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची, अटी व शर्तीची पुर्तता न करणाऱ्या निविदाधारकांचे लिफाफा क्रमांक ब (व्यापारी लिफाफा) उघडण्यात येणार नाही व त्यांची निविदा रद्य करण्यात येईल.

१६. ई-निविदेपोटी अनामत रक्कम वर नमुद केल्याप्रमाणे प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गडचिरोली यांच्या नावे Online Payment व्दारेच भरणा करावे लागेल. तथापि अनामत रक्कम भरण्यापासून सुट असल्यास त्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र स्कॅन करुन अपलोड करावे त्याशिवाय ई-निविदा ग्राहय धरली जाणार नाही.

१७. **एखाद्या आश्रमशाळेस निविदा प्राप्त न झाल्यास जवळच्या आश्रमशाळेतील पुरवठाधारकास मंजुर दराने अंडी पुरवठा करणे बंधनकारक आहे. याबाबत प्रकल्प अधिकारी यांचा निर्णय अंतिम राहील व निविदाधारकास तो बंधनकारक राहील. सदर आदेश देत असतांना पुढील आश्रमशाळा (घाटी, येंगलखेडा, सोनसरी, अंगारा), (भाडभिडी, रेगडी, मार्कंडादेव), (सावरगाव, मुरुमगाव, ग्यॅरापत्ती, येरमागड), (कोरची, मसेली, कौटगुल, रामगड), (कारवाफा, पेंढरी, पोटेगाव, गडचिरोली), (कुरंडीमाल, भाकरोंडी), (सोडे, रांगी, गोडलवाही) यांचे गटामध्ये न्युनतम दरधारकास इतर त्यागटातील आश्रमशाळेस वाटाघाटी दराने अंडी पुरवठा करणे अनिवार्य आहे. आश्रमशाळेतील वरील गटांपैकी संपुर्ण आश्रमशाळा गटास निविदा प्राप्त न झाल्यास सदर आश्रमशाळे जवळील असलेल्या आश्रमशाळा गटातील न्युनतम दर असलेल्या निविदाधारकास सदर आश्रमशाळांना अंडी पुरवठा आदेश देण्यात येईल व याबाबत प्रकल्प अधिकारी यांचा निर्णय अंतीम राहील.**

१८. **न्युनतम दरधारक यांचे दर बाजारभाव किंवा शासकिय दर यापेक्षा जास्त असल्यास वाटाघाटी करुन दर निश्चित करण्यात येईल. याबाबतचा निविदा समितीचा निर्णय अंतीम राहील.**

## पाकीट क्रमांक १ (तांत्रीक लिफाफा)

### -: तांत्रीक लिफाफा मधील आवश्यक कागदपत्रे :-

१) निविदेमधील आवश्यक व विहीत केलेले सर्व नमुने सही शिक्यानिशी परिपूर्ण भरणे आवश्यक आहे

२) निविदा अर्ज ऑनलाईन अपलोड करणे आवश्यक आहे.

३) निविदा फॉर्म शुल्क रू १२००/-(ना परतावा)व बयाणा रक्कम ६०००/-ऑनलाईन स्वरुपात (online Payment Gateway mode/ RTGS/NEFT) भरणे आवश्यक आहे. बयाणा रक्कम (EMD) भरणेस सुट असल्यास त्याबाबतचे सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र (As per Industry Dept. G.R. 1/12/2016 Para no. 3.1.2.1. - Annexure-8) ऑनलाईन पध्दतीने सादर करणे (to be uploaded) बंधनकारक आहे. E-Payment Gateway संदर्भात आवश्यक माहिती ई-निविदा वेबसाईट http://www.mahatenders.gov.in वर उपलब्ध आहे.

४) वस्तु व सेवा कर GST नोंदणी व ३१ जानेवारी २०२० पर्यतचे वस्तु व सेवा कर (GST) निपटारा केल्याचे प्रमाणपत्र.

५) सक्षम प्राधिका-याचे व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र - जेथे ज्या प्राधिका-याचे लागू असेल त्यांचे (मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ अन्वये नमुना ड प्रमाणपत्र / ग्रामपंचायत प्रमाणपत्र) निविदेतील वस्तुं करीता नोंदणी प्रमाणपत्र.

६) निविदाकाराने अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ यांचे अंतर्गत प्रदान करण्यात आलली अनुज्ञप्ती/प्रमाणपत्र औषधे प्रशासन यांचे नोदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

७) निविदाकारांनी ज्या नावाने निविदा भरली आहे फक्त त्यांचेच मागील तीन वर्षाची (सन २०१६-१७, २०१७-१८,२०१८-१९) सरासरी उलाढाल किमान रू. ५लक्ष असणे आवश्यक आहे. उलाढाल दर्शविणारे मान्यताप्राप्त सनदी लेखापाल यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

८) PAN कार्ड ची प्रत

९) सन २०१६-१७, २०१७-१८, २०१८-१९ (Assessment year २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२०) आयकर विवरणपत्र सादर करावे

१०) निविदाकारास सरकारी / निमसरकारी / नामांकित खाजगी संस्थेस पुरवठयाच्या मागील ३ (२०१७-१८, २०१८-१९, २०१९-२०) वर्षापैकी कोणत्याही एका वर्षाचे अनुभवाचे व ते समाधानकारक पुरवठा केल्याचे सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र सोबत जोडावे.

११) सदर निविदेत भाग घेणे, निविदेची कागदपत्रे सादर करणे, बैठकीकरीता उपस्थित राहण्याकरीता तसेच निविदेविषयक कामकाज पाहण्याकरीता प्रतिनिधीस प्राधिकृत केल्याचे पत्र. (सोबत नमुना जोडला आहे)

१२) बचत गटांच्या बाबतीत सदर बचत गट MSRLM, DRDA, MAVM, DUDA यांच्या अंतर्गत नोदणीकृत अथवा प्राधिकृत असणे आवश्यक आहे.

१३) निविदाकारास निविदेतील अटी व शर्ती मंजुर असल्याचे, काळया यादीत समाविष्ट नसल्याचे व विविध कायदयांचे पालन करणारे तसेच इतर बाबीसदर्भात संलग्न (नमुना क्र.३) नुसार प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.(नमुना जोडला आहे)

१४) निविदाकाराने वाहतुकीसाठी वाहणे उपलब्ध करुन देऊ शकेल या आशयाचे वाहतुकदाराचे संमतीपत्र जोडणे आवश्यक आहे.

**टीपः-** निवीदाकाराने वर नमुद केल्यानुसारच सर्व कागदपत्र सादर करणे आवश्यक आहे. सदर कागदपत्रा शिवाय पर्यायी कागदपत्र स्विकारले जाणार नाहीत.

## सर्वसाधारण अटी व शर्ती

१) उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दिनांक १/१२/२०१६ यातील तरतूदी लागू राहतील.

२) पुरवठा करावयाच्या बाबीसाठी विहीत मानांकन, दर्जा व इतर तपशिल परिशिष्ट १ मध्ये नमुद केला आहे.

३) निविदाकाराने प्रत्येक वस्तुंचे संख्याचे नमुने म्हणून तपासणीसाठी सादर करावेत. समितीने निवडलेले नमुने तपासणीसाठी पाठविण्यात येतील. तांत्रिक निविदेतील अत्यावश्यक कागदपत्रांची पूर्तता नसलेल्या व अपात्र ठरलेले नमुने असलेल्या निविदाकाराच्या व्यापारी दराच्या लिफाफयातील वस्तूंच्या दरांचे वाचन केले जाणार नाही अथवा लिफाफा उघडण्यात येणार नाही व याबाबत कुठलाही पत्रव्यवहार ग्राहय धरला जाणार नाही.

४) माल पुरवठयासंबधी स्विकृत निविदाकारास नियमानुसार करारनामा करुन द्यावा लागेल. याचा पूर्ण खर्च पुरवठादराने करावयाचा आहे.

५) पुरवठा मालाचा नमूना तांत्रिक निविदा उघडते वेळी खरेदी समितीच्या समक्ष प्रस्तुत करावायाचा आहे. सक्षम प्राधिकाऱ्याचे आश्रमशाळेचे आकस्मीक भेटीच्या वेळी करारा प्रमाणे मालाचा पुरवठया मध्ये दर्जात्मक अथवा संख्यात्मक त्रुटी आढळल्यास एकूण देय प्रदानावर कमीत कमी २० टक्के व जास्तीत जास्त ५० टक्के त्या दिवशीच्या दंड आकारण्यात येईल. अंडीचा पुरवठा Grade - A Medium Weight 45-52 gm Shell : Clean, Unbroken and sound shape normal. Yolk : Fairly well centered free from defect या स्पेसिफिकेशन नुसार करण्यात यावा

६) निविदाकाराने शासकीय आश्रमशाळांच्या मागणीनुसार योग्य दर्जाच्या व भेसळविरहीत तसेच मानवी आहारास योग्य वस्तूचा पुरवठा करतांना अन्न व औषधे प्रशासन विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाचे व अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ चे नियमावलीतील नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.

७) ज्या निविदाकाराची निविदा नामंजूर करण्यांत येईल त्यांची बयाणा रक्कम परत करण्यात येईल. मात्र ज्यांची निविदा मंजूर केली जाईल त्यांना दिलेल्या मुदतीत सुरक्षा ठेव जमा करावी लागेल. तसे न केल्यास किंवा असमर्थता दर्शविल्यास बयाणा रक्कम (EMD) जप्त करण्यात येईल. बयाणा रकमेवर कुठल्याही प्रकारे व्याज देण्यात येणार नाही.

८) निविदेत नमूद केलेले दर हे सर्व खर्चासहित व करांसहीत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गडचिरोली, कार्यालयातर्गत कार्यरत असलेल्या शासकीय आश्रमशाळे च्या भांडारगृहापर्यंत पोहोच असावे. नमुद दर हे भारतीय रुपयामध्ये राहतील. पुरवठादारास खरेदीच्या संख्या/परिमानावर हक्क सांगता येणार नाही. पुरवठा कालावधीत साहित्यांच्या किंमतीत वाढ झाल्यास वाढीव दराची मागणी पुरवठादारास करता येणार नाही. याबाबतचे सर्व अधिकार प्रकल्प अधिकारी, एंकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गडचिरोली यांनी राखून ठेवले आहेत. निविदेत भाग घेतलेल्या निविदाकारनेच प्रत्यक्ष काम करावयाचे असुन कोणत्याही परिस्थितीत उप ठेकेदार नेमता येणार नाही.

९) अनुज्ञप्ती शुल्क कर (Permit, Fees, Taxes) करारनाम्यात स्पष्टपणे निर्धारीत केलेले नसेल तर सदर कामाच्या कार्यवहन आणि कार्यपुर्तीसाठी आवश्यक असणारे सर्व अनुज्ञप्ती शासकीय शुल्क आणि परमिट घेऊन त्यासाठी येणारा सर्व खर्च निविदाधारकाने करावयाचा आहे. निविदाधारकाने कायद्याचे आवश्यक असलेले केंद्र शासन/राज्य शासन यांचे स्थानिक कर आणि शुल्क इतर बोजा मुद्राकशुल्क विमा, लेखापरीक्षेत वसुली इत्यादीचा खर्च करावयाचा आहे. सदर कर संकलन करणारी यंत्रणा आणि निविदाधारक यांचे कुठल्याही प्रकारचा वादविवाद उत्पन्न झाल्यास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली हे अशा कर शुल्काच्या परताव्यास जबाबदार असणार नाहीत. कोणतेही कर परमिट शुल्क आणि अनुज्ञप्ती यांचे कायदेशीर तरतुदींचे निविदाधारकांने उल्लघन केले आणि सदर बाब निदर्शनास आल्यास त्यास सर्वस्वी निविदाधारक आणि त्यांचे कायदेशीर वारस जबाबदार असतील.

१०) पुरवठा आदेश दिल्यापासून ७ दिवसाच्या आत पुरवठा सुरु करावा लागेल, मुदतीत पुरवठा सुरु न केल्यास किंवा पुरवठयाची असमर्थता दर्शविल्यास पुरवठयाचा करार रद्द करण्यात येईल व सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व कार्यालयांचे होणारे कोणतेही नुकसानीचे पुरवठादाराकडुन वसुल करणेत येईल व नुकसानीसाठी कायदेशीर कारवाई करण्यात येईल. पुरवठा आदेशाप्रमाणे पुरवठा करण्यासाठी कोणत्याही प्रकारे अग्रिम रक्कम मिळणार नाही.

११) प्राप्त निविदेतील निविदाकाराने भरलेले प्रत्येक वस्तुंचे दर हे स्वतंत्र भरण्यात यावेत. कारण प्रत्येक वस्तुंचा दरांचा स्वतंत्रपणे विचार करण्यात येईल.

१२) निविदाकाराने निविदा अर्ज ऑनलाईन पध्दतीने (ई-निविदा) विहीत नमुन्यात व पूर्ण भरणे आवश्यक आहे. अपूर्ण, चुकीचा व अन्य कोणत्याही स्वरुपातील निविदा अर्ज विचारात घेण्यात येणार नाही. निविदा भरतांना येणा-या अडचणी जसे Internet Connectivity, Server speed, विद्युत पुरवठा इत्यादी बाबत या विभागाची कोणतेही जबाबदारी राहणार नाही.

१३) निविदा दर केवळ व्यापारी लिफाफयातील विहीत नमुन्यात सादर करणे बंधनकारक असुन निविदेत अन्यत्र दर प्रदर्शित केल्यास अशी निविदा अपात्र ठरविण्यात येईल

१४) निविदाकाराने सादर केलेली कागदपत्रे बनावट/चूकीची आढळल्यास अशा निविदाकाराची निविदा विचारात घेतली जाणार नाही व त्याच्याविरुध्द योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल, अशा निविदाकारास भविष्यात आदिवासी विकास विभागाच्या कोणत्याही निविदेत भाग घेता येणार नाही.

१५) निविदेतील सर्व कागदपत्रे सही शिक्यानिशी स्वसाक्षांकित (Self Attested) करणे आवश्यक

१६) ज्या पुरवठादाराचे दर मंजूर होतील त्यांना वर नमुद केल्यानुसार आश्रमशाळांच्या ठिकाणी पुरवठा आदेशातील संख्येनुसार साहित्याची वाहतूक स्वखर्चाने करुन पोहच करावी लागेल. या संदर्भातील आदेशामध्ये दुरुस्ती करण्याचे सर्व अधिकार प्रकल अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली यांना असतील.

१७) महिला बचत गटांनी शासन नियमानुसार आवश्यक ती कागदपत्रांची पुर्तता करणे बंधन कारक राहील.

१८) निविदेमध्ये पुरवठा करावयाच्या साहित्याची नगसंख्या अंदाजित आहे. त्यामध्ये कमी / जास्त होण्याची शक्यता आहे. जर साहित्य कमी किंवा जास्त आवश्यकता वाटल्यास निविदेतील दराप्रमाणे पुरवठा करण्यास पुरवठादारास बंधनकारक राहील.

१९) पुरवठादाराच्या अपु-या पुरवठयामुळे व मालाची निकड लक्षात घेता किंवा पुरवठा वेळेत न केल्यास जादा दराने या कार्यालयास दुसरीकडून माल खरेदी करावा लागला तर या कार्यालयास झालेले नुकसान पुरवठाधाराकडून वसूल केले जाईल. व देय रक्कमेच्या प्रती आठवडा अर्धा टक्के रक्कम कमीत कमी व जास्तीत जास्त ५ टक्के पर्यंत दंड आकारल्या जाईल. तसेच या अनुषंगाने करार रद्द करणे किंवा कायदेशीर कारवाई करण्याचा अधिकार प्रकल्प अधिकारी, गडचिरोली यांना राहतील. व या बाबत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली यांचा निर्णय अतिम राहील.

२०) पुरवठादाराने पुरवठा करतांना काही अपरिहार्य तांत्रिक अडचणीमुळे पुरवठयास विलंब होण्याची शक्यता असल्यास तसे लेखी प्रकल्प अधिकारी गडचिरोली यांना योग्य समर्थनासह ७ दिवस आगाऊ कळविणे आवश्यक आहे. याबाबत प्रकल्प अधिकारी गडचिरोली यांचा निर्णय पुरवठाधारकास बंधनकारक राहील.

२१) मालाच्या मंजुर केलेल्या अधिकृत नमुन्याप्रमाणे व ठरवुन दिलेल्या मुदतीत साहित्याचा पुरवठा झाल्याची खात्री झाल्यानंतर संबंधीत मुख्याध्यापक व अधिक्षक यांचेकडुन निविदाधारकाने मंजुर नमुन्याप्रमाणे माल प्राप्त झाल्याचे प्रमाणपत्र घेण्यात यावे. व तसे देयक आश्रमशाळा स्तरावर सादर करण्यात यावे.

२२) पुरवठाधारकाकडुन शासकीय आश्रमशाळांना ज्या वस्तुंचा पुरवठा केला, त्याबाबत प्रकल्प अधिकारी यांच्याकडुन दर्जा खराब आल्याचे आढळल्यास व कायदेशीर कारवाई झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी पुरवठाधारकाची राहील.

२३) पुरवठा आदेशाच्या दिनांका पासून ७ दिवसाच्या आत आश्रमशाळा निहाय्य पुरवठा सुरु करणे बंधनकारक राहील.

२४) प्रदानाच्या अटी (Terms of Payment) सर्व वस्तुंच्या पुरवठयानंतर मुख्याध्यापक व अधिक्षक यांचे कडुन माल ताब्यात मिळाल्याच्या पोहोच पावतीसह खरेदी देयके तीन प्रतीमध्ये मुख्याध्यापक यांचे कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.मुख्याध्यापक यांनी सदर देयक प्रती स्वाक्षरीकरिता प्रकल्प कार्यालयास सादर करावे. देयकाच्या ८० टक्के रक्कम निविदाधारकास अदा करण्यात येईल आणि उर्वरीत २० टक्के रक्कम मालाचा समाधानकारक पुरवठा व प्रयोगशाळा तपासणीचा समाधानकारक अहवाल CCTV Footage, SMC प्रमाणपत्र, Mobile Apps. याचा विहीत अहवाल प्राप्त झाल्यानंतरच अदा करण्यात येईल. देयके अदायगीमध्ये कुठल्याही कारणांमुळे विलंब झाल्यास निविदाधारक त्यावर कुठल्याही व्याजाची मागणी करणार नाही.

**२५) प्रयोगशाळा चाचणी आणि तपासणी (Lab Testing & Inspection) :- पुरवठा केलेल्या वस्तुची शासकीय प्रयोगशाळेमध्ये आकस्मिक (Random) तपासणी करणेत येईल. स्थानिक कार्यालयाकडुन वस्तुंचे नमुने काढण्यात येतील. सदर नमुने शासनाने निश्चित केलेल्या विहीत मांनाकाप्रमाणे मानवी खाण्यास योग्य असल्याबाबत शासकीयं प्रयोशाळा तपासणीसाठी येणारा खर्च निविदाधाकाकडुन वसुल करण्यात येईल.**

२६) विहीत दर्जाच्या नमुन्याप्रमाणेच सर्व माल/वस्तुंचा पुरवठा करणेची पुरवठादाराची जबाबदारी आहे. पुरवठा केलेला माल/वस्तु विहीत दर्जाच्या आढळून न आल्यास त्या १० दिवसात पुरवठादाराने स्वखर्चाने बदलून देणे बंधनकारक आहे. तसेच अशा मालाचा साठा पुरवठादारास परत करणेबाबत या विभागाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

२७) पुरवठा कालावधीमध्ये साहित्याचा पुरवठा न झाल्यास पुरवठा न झालेल्या मालाच्या किमतीच्या १० टक्के इतकी रक्कम दंड म्हणून वसुल करण्यात येईल.

२८) कोणतेही कारण न देता एखादी किंवा सर्व निविदा प्रक्रिया कुठल्याही स्तरावर पूर्णत: अथवा अंशत: मंजुर करण्याचा अगर नामंजूर करण्याचा अधिकार हा खरेदी समितीस अथवा प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गडचिरोली यांना आहे.

२९) उपद्रवकारक तक्रारीबाबत शासन निर्णय ०१/१२/२०१६ व वेळोवेळीं निर्गमित शासन निर्णया नुसार कार्यवाही करण्यात येईल.

३०) विवाद (Disputes) :- अ) निविदाधारक आणि मुख्याध्यापक/अधिक्षक यांच्यात कुठल्याही कारणास्तव विवाद (Dispute) उत्पन्न झाल्यास प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गडचिरोली यांना विवादाच्या दिनांकापासुन १४ दिवासाच्या आंत सादर प्रकरण लेखी कळविण्यात येईल.

ब) प्रकल्प अधिकारी हे सदर प्रकरणावर आपला निर्णय देतील ) प्रकल्प अधिकारी यांनी दिलेला निर्णय अंतिम आणि उपरोक्त दोनही बाजुवर बंधनकारक राहील.

३१) कायदे आणि नियमन (Laws and Regulations) :- भारत, महाराष्ट्र शासन आणि विभागातील स्थानिक संस्थांचे कायदे आणि उपकायाद्यानुसार करारनामा तयार करण्यात येईल आणि त्याची अंमलबजावणी करण्यात येईल. या करारनाम्यामुळे व करारनाम्याअंतर्गत कुठल्याही प्रकारचा वादविवाद उद्‌भवल्यास तो गडचिरोली जिल्हा सत्र न्यायालयाच्या कार्यकक्षेतच करता येईल.

३२) दर्जा विषयक कोणत्याही तक्रारी होणार नाही याबाबत संपूर्ण जवाबदारी पुरवठाधरकाची राहील.

३३) अंडयांचा पूरवठा आठवडाभरात प्रत्येक दिवशी प्रती विद्यार्थ्यी एक अंडी पुरविणे आवश्यक राहील.

३६) निवीदा मंजुर झाले नंतर प्रकल्प अधिकारी व मुख्याध्यापक यांचे आदेशाची पुर्तता न केल्यास किंवा अंडी पुरवठा मध्येच बंद केल्यास अनामत रक्कम जप्त करुन शासन खाती जमां करण्यात येईल. तसेच बाजार भावानुसार अंडी खरेदी करावे लागल्यास निविदेतील दर व बाजारभावाची किंमत यातील फरक व त्यावर २५%. दंड आकारण्यात येईल तसेच शासकीय प्रचलित नियमाप्रामणे कार्यवाही केली जाईल.

३७) प्रत्येक महिण्याचे देयकातुन आयकर व GST , इतर कर कपात केला जाईल त्याकरिता पॅन नंबर व GST ( वस्तू ब सेवा कर ) नंबर देयकावर नमूद करणे आवश्यक आहे. अन्यथा देयके पारीत करण्यात येणार नाही. तसेच शासनाचे विहीत वेळेत इतर कर भरणे आवश्यक आहे.

३८) पुरवठा करण्यात आलेल्या अंडयांपासुन काही विषबाधा झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी पुरवठाधारकाची राहील.

३९) पुरवठाधारकाने विहीत कालावधीत देयके आश्रमशाळांवर देवून तशी पोहच घेवून कार्यालयास सादर करावी देयके कार्यालयास उशीरा सादर केल्यास कार्यालयाकडून दंड आकारण्यात येईल व सदर दंड भरल्याशिवाय देयके पारीत केल्या जाणार नाही.

४०) प्रकल्प अधिकारी, एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प गडचिरोली यांचे द्वारा वेळोवेळी लावण्यात येणा-या अटी व शर्ती पुरवठाधारकास बंधनकारक राहतील.

४१) अटी व शर्ती मान्य असलेबाबत करारनामा रुपये १००/- कोर्ट स्टॅम्प पेपरवर करुन द्यावे लागेल.

४२) निविदा स्विकारणे, नाकारणे किंवा रद्द करणे या बाबत संपुर्ण अधिकार प्रकल्प अधिकारी यांचे अधिनस्त समितीने राखुन ठेवले आहे.

४३)सद्यस्थितीत Covid-१९ या संसर्गजन्य आजारामुळे लॉकडाऊन सुरु असल्याने सदर निविदा प्रक्रीयेच्या कालावधीत बदल करण्याचा तसेच निविदा प्रक्रीया पुर्ण झाल्यानंतरही आदेश पारीत करणेबाबत कालावधीत बदल करण्याचा अधिकार प्रकल्प अधिकारी यांनी राखून ठेवला आहे.

४४) निविदेतील उपरोक्त नमुद अटी व शर्तीत बदल करण्याचा अधिकार प्रकल्प अधिकारी यांचा राहील व ते निविदाधारकास बंधनकारक राहील.

( राहुल गुप्ता , भा.प्र.से.)
सहाय्यक जिल्हाधिकारी व प्रकल्प अधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
गडचिरोली

उपरोक्त अटी व शर्ती मी / आम्ही काळजीपूर्वक वाचल्या असून त्या मला / आम्हाला मान्य असून बंधनकारक राहतील. करिता स्वाक्षरी केली आहे.

ठिकाण

दिनांक -

निविदाकाराची स्वाक्षरी /नांव शिक्का

## निविदाकाराची माहिती

| | | |
|---|---|---|
| **निविदाधारकाचे नांव** | | |
| निविदाधारकाचा संपूर्ण पत्ता | | |
| दुरध्वनी क्रमांक | कार्यालय | |
| | कंपनी | |
| | मोबाईल क्रमांक | |
| ई मेल आय डी | | |
| | | |
| व्हॅट रजिस्ट्रेशन नंबर | | |
| जी. एस. टी. रजिस्ट्रेशन नंबर | | |
| पॅन नंबर | | |
| बयाणा रक्कम | | |
| एस.एस.आय भाग-२ नोंदणी प्रमाणपत्र नंबर (लागू असल्यास) | | |
| संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र | | |
| नमुना सादर | होय/नाही | |

**निविदाकाराची स्वाक्षरी/नांव व शिक्का**

# नमुना क्र. १

दिनांक : / /

प्रति,

मा. प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
गडचिरोली, जि.गडचिरोली

विषय : ................................................................................

आदरणीय महोदय,

आम्ही............................................................ एक नावाजलेले उत्पादक / पुरवठादार असून.............................................................. वस्तूचे उत्पादन / पुरवठादार आमच्या ........................................................................................ या ठिकाणी करीत आहोत. या संदर्भात आम्ही ........................................................................ यांना आमच्या कंपन्याचे उत्पादीत / पुरवठा वस्तुसाठी निविदा प्रक्रियेत भाग घेणे, दर ठरविणे, कान्ट्रॅक्टप्रमाणे अंतिमतः पुरवठा पूर्ण करणे यासाठी सर्वस्वी अधिकार या विशेष निविदा नंबर ........................... साठी देत आहोत.

आपला विश्वासू

प्राधिकृत केलेल्या व्यक्तीची स्वाक्षरी

**निविदाकाराची स्वाक्षरी/नांव व तपशिल**

नमुना क्रं. २

प्रतिज्ञापत्र

दिनांक / /

प्रति,

प्रकल्प अधिकारी,

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प

गडचिरोली.

मी, प्रतिज्ञेवर सादर करतो की, शासकिय आदिवासी आश्रमशाळांना अंडी पुरविणेबाबतच्या निविदेतील सर्व अटी व शर्ती मी वाचल्या असुन त्या मला मान्य आहेत.

निविदेत सादर केलेली सर्व कागदपत्रे सत्य व खरी असुन त्यात कोणतेही फेर-फार केलेली नाही. निविदेत नमुद केलेले दर हे विना अट आहेत.

तसेच मला अथवा माझ्या संस्थेस कोणत्याही शासकीय, निम शासकीय, शासन अंगीकृत उपक्रमाने काळ्या यादीत समाविष्ट केलेले नाही वा अशी कारवाई प्रगतीत / प्रस्तावीत नाही.

बालमजुरी, कामगार कायदे , लैगिंक पिळवणूक, मानवाधिकार ई. विषयी आवश्यक धारेणाचेही आमच्याकडून पालन होते.

वरील नमुद सर्व माहिती मान्य असून यात चुक आढळल्यास मी कारवाईस पात्र असेल याची मला पुर्ण जाणीव आहे.

निविदाधारकाची स्वाक्षरी / नाव तपशिल

**टिप :- वरील प्रतिज्ञापत्र रुपये १०० च्या मुंद्रकावर सादर करणे आवश्यक आहे.**

## परिशिष्ट : १

**सन २०२०-२१ करीतां प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गडचिरोली अंतर्गत असलेल्या शासकिय आश्रमशाळांना पुरवठा करावयाच्या अंडीची अंदाजित मागणी.**

| अ.क्र. | साहित्याचे नांव | आकारमान | अंदाजित मागणी |
|---|---|---|---|
| | अंडी (कोंबडीचे) | 1 नग (कोंबडीचे अंडी)<br>Grade - A Medium<br>Weight 45-52 gm<br>Shell : Clean, Unbroken and sound shape normal.<br>Yolk : Fairly well centered free from defect | ७५००० नग |

**टिप :-** शासकिय आश्रमशाळा निहाय्य होणारी मागणी तसेच आदेशाचा देय दिनांक यापासून उर्वरीत सत्रातील दिवस यानुसार पुरवठादारास देण्यात येणाऱ्या पुरवठा आदेशातील वस्तूंची मागणी ही कमी अधिक होऊ शकते.

महाराष्ट्र शासन

आदिवासी विकास विभाग

# प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गडचिरोली

# शासकीय आश्रमशाळेतील विदयार्थ्यांना अंडी पुरविणेबाबत

## (ऑन लाईन व्यापारी लिफाफा)

२०२०-२१

# व्यापारी लिफाफा

## लिफाफा क्र. २

**प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गडचिरोली**

---

**सन २०२०-२१ या वर्षाकरीता शासकीय आश्रमशाळा विद्यार्थ्यांना अंडी पुरविण्याची निविदा**

१ निविदेसोबत देण्यात आलेल्या BOQ file मध्येच दर भरुन वेंबसाईटवर अपलोड करावे.

२. निविदाधारकाने BOQ मधील बाबीचे (ITEM) वर दर देणे आवश्यक आहे अन्यथा निविदा ग्राहय धरल्या जाणार नाही.

---

१) उत्पादक संस्थेचे नांव व संपुर्ण पत्ता :

| अ.क्र. | साहित्याचे नांव | आकारमान | प्रति नग दर रुपये (सर्व करांसह व वाहतुक खर्चासह) |
|---|---|---|---|
| | अंडीचा पूरवठा | 1 नग (कोंबडीचे अंडी)<br>Grade - A Medium<br>Weight 45-52 gm<br>Shell : Clean, Unbroken and sound shape normal.<br>Yolk : Fairly well centered free from defect. | |

निविदाकाराची स्वाक्षरी

दिनांक

ठिकाण :

(नांव, हुद्दा व शिक्का)